**नि.फौ.ख.क्र.५४७/२०२१**
**नि.३१**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.२ चा शपथपूर्वक जबाब**
**मी शपथेवर सत्य कथन करतो की,**

**माझे नाव – बाळासाहेब रेवजी शेळके,**
**वय –** ५५ वर्षे, व्यवसाय– शेती,
**राहणार –** आडगांव खुर्द, ता.राहाता, जि.अहमदनगर.

---

**सरतपास– अभियोगपक्षातर्फे श्री. जी.व्ही. बोर्डे,विद्वान विशेष सहायक सरकारी अभियोक्ता यांच्यातर्फे**

दिनांक १७/०६/२०२१ रोजी आरोपी व आमच्यात किरकोळ वाद झाले होते. त्यादिवशी गर्दी जमली होती व कोणी कोणास मारहाण केली ते मला सांगता येणार नाही. मी व इतर जखमी यांनी दवाखान्यात उपचार घेतले होते. या व्यतिरिक्त काहीही झाले नव्हते. पोलीसांनी माझा जबाब घेतला किंवा कसे ते मला आठवत नाही.

**(साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करत नसल्यामुळे सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उत्तर सुचक सुचन देण्याची परवानगी मागितली. परवानगी मंजुर करणेत आली.)**

२. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या दिवशी आरोपींनी रस्त्यावर मुरूम टाकण्याच्या कारणावरून आमच्यात किरकोळ वाद झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, सर्व आरोपी माझे जवळचे नातेवाईक आहेत. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी आरोपींनी मला काठी व लोखंडी गजाने मारहाण केली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी माझा मुलगा पंकज सोडवायला आला असता, आरोपींनी त्याला देखील लाकडी काठ्यांनी व गजानी मारहाण केली. हे मला आठवत नाही की, त्या घटनेसंबंधाने आम्ही पोलीस स्टेशनला गेलो व तेथे फिर्यादी नानासाहेब यांनी फिर्याद दाखल केली होती. आता मला माझे जबाबातील अधोरेखांकित भाग अ वाचून दाखविला. तो बरोबर नसुन तो तेथे का नमुद आहे याचे कारण मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र.२५ मधून गट क्र.५१९ पर्यंत मुरूम टाकून रस्ता पूर्ण झाला असुन त्याबाबत आमच्यात कोणतीही तक्रार आता राहिलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे माझ्यात व आरोपींमधील वाद न्यायालयाबाहेर आपसात मिटले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हे माझे भाऊबंध

असल्यामुळे व आमची न्यायालयाबाहेर आपसी तडजोड झाल्यामुळे मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास – आरोपीतर्फे विद्वान विधिज्ञ श्रीमती एस.एस.झाडे यांनी नाकारला.**

**फेरतपास काही नाही.**

**साक्षीदार मुक्त.**

दिनांक – ०४/०४/२०२६

माझे समक्ष

PRASAD SHANKARRAO GIRGAONKAR
Digitally signed by PRASAD SHANKARRAO GIRGAONKAR
Date: 2026.04.04 15:09:47 +0530

(प्र. शं. गिरगांवकर)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.३), राहाता.

श्रवणोत्तर स्वीकृती

PRASAD SHANKARRAO GIRGAONKAR
Digitally signed by PRASAD SHANKARRAO GIRGAONKAR
Date: 2026.04.04 15:09:54 +0530

(प्र. शं. गिरगांवकर)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.३), राहाता.